जा.क्र.कृतंमाकें/प्रका.छपा./दरपत्रक/४४२/२०२२
कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र
डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली
दिनांक :— 15 NOV 2022

प्रति,

________________

________________

________________

**विषय :—** २०२२—२३, २०२३—२४ मधील विविध प्रकाशने छपाईची दरपत्रके पुरविणेबाबत...

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली विस्तार शिक्षण संचालनालयामार्फत दरवर्षी विविध प्रकाशने छपाई केली जातात. जसे की, कृषि दैनंदिनी, वेगवेगळया आकाराची पुस्तके, पुस्तिका, घडीपत्रिका, पॉकेट बुक इत्यादी त्यासाठी खालीलप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशील | पुस्तके | | घडीपत्रिका | |
|---|---|---|---|---|---|
| | | १/४ क्राऊन | १/८ डेमी | ४ पानी २१.५ X २८ सेमी | ६ पानी २१.५ X ४२ सेमी |
| १. | सिनारमास आर्ट (१७० जीएस्एम्) पेपरवर ४ रंगात मुखपृष्ठ छपाई | रु. /— प्रति पृष्ठास | रु. /— प्रति पृष्ठास | — | — |
| २. | सिनारमास आर्ट (२०० जीएस्एम्) पेपरवर ४ रंगात मुखपृष्ठ छपाई | रु. /— प्रति पृष्ठास | रु. /— प्रति पृष्ठास | — | — |
| ३. | सिनारमास आर्ट (३०० जीएस्एम्) पेपरवर ४ रंगात मुखपृष्ठ छपाई | रु. /— प्रति पृष्ठास | रु. /— प्रति पृष्ठास | — | — |
| ४. | बल्लारपूर मॅपलिथो डिलक्स (७० जीएस्एम्) पेपरवर मजकूर छपाई (एका रंगात) | रु. /— प्रति पृष्ठास | रु. /— प्रति पृष्ठास | — | — |
| ५. | बल्लारपूर मॅपलिथो डिलक्स (१०० जीएस्एम्) पेपरवर मजकूर छपाई (एका रंगात) | रु. /— प्रति पृष्ठास | रु. /— प्रति पृष्ठास | — | — |
| ६. | आर्टप्लेट छपाई (१२०जीएसएम्) सिनारमास पेपर | रु. /— प्रति पृष्ठास | रु. /— प्रति पृष्ठास | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | आर्टप्लेट छपाई (१३०जीएसएम्) सिनारमास पेपर | रु. /— प्रति पृष्ठास. | रु. /— प्रति पृष्ठास | — | — |
| ८. | परफेक्ट बायडिंग | रु. /— प्रति नगास | रु. /— प्रति नगास | — | — |
| ९. | केस बायडिंग | रु. /— प्रति नगास | रु. /— प्रति नगास | — | — |
| १०. | फोटो प्रोसेसिंग/पॉझिटिव्ह | रु. /— प्रति नगास | रु. /— प्रति नगास | | |
| ११. | लॅमीनेशन | रु. /— प्रति नगास | रु. /— प्रति नगास | — | — |
| १२. | डि.टी.पी. चार्जेस | रु. /— प्रति पृष्ठास | रु. /— प्रति पृष्ठास | — | — |

**(टीप : दरपत्रकात कृषि दैनंदिनी प्रत्येकी ५००० प्रतींकरीता व इतर प्रकाशने किमान १००० प्रति पृष्ठाचा दर नमूद करण्यात यावा.)**

**दरपत्रके पुरविण्याकरीता अटी व शर्ती :—**

१. बंद लखोटयातील दरपत्रके **दि. ०१/१२/२०२२ पर्यंत** व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली, जि. रत्नागिरी, पिन ४१५७१२ या कार्यालयात पोहोच होणे आवश्यक आहे.

२. बंद लखोटयावर 'विद्यापीठ प्रकाशने छपाईचे दरपत्रक' असे स्पष्ट नमूद करावे.

३. विद्यापीठाच्या विहित नमुन्यामध्ये छपाईदारांनी दरपत्रक सादर केले पाहिजे.

४. विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके **दि. ०२/१२/२०२२ रोजी** या कार्यालयात उघडण्यात येतील.

५. टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६. दरपत्रकातील दर हे सर्व कर जमेस धरुन उदा. जीएसटी, सेवा कर, विक्री कर, सर्वसाधारण विक्री कर,एक्साईज डयूटी, जकात, वाहतूक ख़र्च व दापोली कार्यालय पोहोच इत्यादी असावेत.

७. जीएसटी क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधीकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेले पुरवठाधारकाचे लेटरहेड वरील दरपत्रक आवश्यक, सोबत पॅनकार्ड प्रत जोडणे आवश्यक आहे.

८. एखादे दरपत्रक उघडया लखोटयातून किंवा उल्लेखित मुदतीनंतर प्राप्त झाल्यास ते स्विकारले जाणार नाही.

९. विद्यापीठाने प्रकाशने छपाईचे वाढीव काम दिल्यास पुरवठादाराने ते दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या दराप्रमाणे करावे लागेल.

१०. डिटीपीचे दर प्रति पृष्ठास स्वतंत्रपणे नमूद करावेत (पाठपोट नव्हे). तसेच मुखपृष्ठ अथवा मजकूर छपाईसाठीचा/आर्टप्लेटचा दर हा प्रति पृष्ठ म्हणजेच एक बाजू धरुन नमूद करावा (पाठपोट नव्हे).

११. विद्यापीठ प्रकाशने छपाईची ऑर्डर दिल्याच्या तारखेपासून प्रकाशनाचा पुरवठा २० दिवसात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली येथे कार्यालयीन वेळेत केला पाहिजे.

१२. छपाईचे काम पूर्ण झाल्यावर संबंधित पुरवठादाराने संपूर्ण मजकूराची पीडीएफ् फाईल करुन त्याच्या दोन सीडी विद्यापीठास द्यावयाच्या आहेत.

१३. आपण दिलेले दर हे दरपत्रक स्विकारल्यांपासून एक वर्षापर्यंत वैध राहतील. दिलेल्या आकारात इतर प्रकाशने विद्यापीठास छपाई करुन घ्यावयाची असल्यास आपण दिलेल्या दरात छपाई करुन देणे बंधनकारक राहिल.

१४. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरुस्त करण्याचा/नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

१५. छपाई संदर्भात वापरण्यात येणारे कागदाचे नमुने दरपत्रकासोबत जोडण्यात यावेत. कागदाचा नमुना जोडताना पूर्ण कागद (१८×२३) जोडावा (तुकडा नव्हे). कागदावर वनज नमूद करावे. ठेकेदाराने स्वत:ची सही करावी व फर्मचा शिक्का मारावा.

१६. प्रकाशनांबाबत तपशील :

अ) आकार : १/८ डेमी, १/४ क्राऊन

ब) मुखपृष्ठ : चार रंगी, सिनारमास आर्टपेपर (१७० जीएस्एम् /२०० जीएस्एम् /३०० जीएसएम)

क) मजकूर : एकरंगी, बल्लारपूर मॅपलिथो डिलक्स (७०जीएस्एम/१०० जीएस्एम्)

ड) आर्टप्लेट : चार रंगी, सिनारमास आर्टपेपर (१२० जीएस्एम् /१३० जीएस्एम)

ई) एकूण पृष्ठे : प्रकाशनानुसार पृष्ठ संख्या बदलतील

फ) परफेक्ट बायडिंग, केस बायडिंग

ज) संख्या : अंदाजे

१७. कोणतेही कारण न देता एखादे किंवा सर्व दरपत्रक किंवा दरपत्रकातील काही भाग स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनाने राखून ठेवले आहेत.

१८. विद्यापीठाची प्रकाशने असल्याने त्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राहतील. त्यामुळे सदर प्रकाशने पुरवठादाराने विद्यापीठाव्यतिरिक्त अन्य कोणालाही विक्री/पुरवठा करु नये.

१९. अधिक माहितीसाठी व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, यांचेशी कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा किंवा ईमेल — atickkv@gmail.com वर संपर्क करावा.

संचालक
विस्तार शिक्षण
डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली

प्रत:—

१. व्यवस्थापक, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, सदरच्या जाहिरातीस विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

२. विद्यापीठातील सर्व सूचना फलक.